Parvatibai Chowgule College of Arts and Science
(Autonomous)
Margao- Goa

MINUTES OF THE MEETING OF BOARD OF STUDIES IN MARATHI
HELD ON 13th November 2020, at 10.00 A.M.

Vide Chowgule college notice (F133C/771 dated on 29th October 2020) a virtual meeting of this BOS was convened on 13th November 2020 at 10.00 a.m. Since the number of members present represented the quorum, the BOS began its proceedings.

Minutes are presented in the format.

Members Present:

1. Miss Trupti Fal Dessai – Chairman
2. Dr. Randheer Shinde – Academic Council Nominee
3. Dr. Sneha Mahambre- Academic Council Nominee
4. Prof. Vinay Bapat – Vice-Chancellor Nominee
5. Mr. Suresh Bhandari – Industry/Corporate Sector
6. Miss. Sonia Sawant - Alumni
7. Miss Anjali Naik- Member Secretary
8. Miss Nikhita Goankar – Member
9. Mr. Pramod Pawar- Member

Proceedings: -

The Chairman of the meeting Miss Trupti Fal Dessai introduced and explained the agenda for the meeting and Board transacted the following business:

Agenda:

1. To approve changes in syllabus.
2. To add new reference books for the course papers.
3. To solve the issues arising while teaching.
4. Any Other Business (A.O.B.)

Part A: Resolution

1. The syllabi of the semester I to VI undergraduate courses were presented and discussed at the meeting. After few changes the BOS resolved to pass the syllabi for the following courses ;

Sr. no.	Courses	Nature of the courses	UG level at which offered
1.	MAR.I.C-1 मराठी कथा स्वरूप आणि उपयोजन (१९४५ ते २०००)	Core	B.A. (MARATHI)
2.	MAR.I.C-2 आधुनिक मराठी कविता स्वरूप आणि उपयोजन (आरंभ ते २०००)	Core	B.A. (MARATHI)
OPTIONAL PAPER			
1.	व्यवहारिक मराठी	Optional	B.A. (MARATHI)
(SEMESTER II) CORE PAPER			
1.	MAR.II.C-3 मराठी कादंबरी स्वरूप आणि उपयोजन (१९४५ ते २०००)	Core	B.A. (MARATHI)
2,	MAR.II.C-4 मराठी नाटक स्वरूप आणि उपयोजन (१९५० ते २०००)	Core	B.A. (MARATHI)
OPTIONAL PAPER			
1.	मराठी वाचन लेखन आणि संभाषण कौशल्ये	Optional	B.A. (MARATHI)
(SEMESTER III) CORE PAPER			
1.	MAR.III.C-5- काव्यशास्त्र (भारतीय व पाश्चात्य)	Core	B.A. (MARATHI)
ELECTIVE PAPER			
1	MAR.III.E-1- प्राचीन मराठी वाङ्मय (प्रारंभ ते १६५०)	Elective	B.A. (MARATHI)
2	MAR.III.E-2- मराठी ललित गद्यः स्वरूप आणि उपयोजन	Elective	B.A. (MARATHI)
3	MAR.III.E-3- साहित्याभिरूचीचे स्वरूप	Elective	B.A. (MARATHI)
4	MAR.III.E-4- गोमंतकीय मराठी साहित्य : समिक्षा आणि संशोधन (कविता, कथा, कादंबरी, बालसाहित्य)	Elective	B.A. (MARATHI)
(SEMESTER IV) CORE PAPER			
1.	MAR.IV.C-6- रसविचार आणि समीक्षाविचार	Core	B.A. (MARATHI)
ELECTIVE PAPER			

1	MAR.IV.E-5- प्राचीन मराठी वाङ्मय (१९५१ ते १८१८)	Elective	B.A. (MARATHI)
2	MAR.IV.E-6- प्रवासवर्णन : एकअभ्यास	Elective	B.A. (MARATHI)
3	MAR.IV.E-7- कार्यक्रम संयोजन व संचालन कौशल्य	Elective	B.A. (MARATHI)
4	MAR.IV.E-8- गोमंतकआणि कोकण या प्रदेशातील लोककला	Elective	B.A. (MARATHI)
(SEMESTER V) CORE PAPER			
1.	MAR.V.C-7- व्याकरण	Core	B.A. (MARATHI)
ELECTIVE PAPER			
1	MAR.V.E-9- मराठी वाङ्मयाचे सांस्कृतिक स्वरूप	Elective	B.A. (MARATHI)
2	MAR.V.E-10- आत्मचरित्र साहित्याप्रकार आणि उपयोजन	Elective	B.A. (MARATHI)
3	MAR.V.E-11- पत्रकारिताः स्वरूप आणि कौशल्ये	Elective	B.A. (MARATHI)
4	MAR.V.E-12- भाषिककौशल्ये आणि व्यक्तिमत्व विकास	Elective	B.A. (MARATHI)
(SEMESTER VI) CORE PAPER			
1.	MAR.VI.C-8- भाषाविज्ञान	Core	B.A. (MARATHI)
ELECTIVE PAPER			
1	MAR.VI.E-13- मुक्तीपूर्व गोमंतकीय मराठी वाङ्मय	Elective	B.A. (MARATHI)
2	MAR.VI.E-14- मराठी प्रादेशिककादंबरी : स्वरूप आणि उपयोजन	Elective	B.A. (MARATHI)
3	MAR.VI.E-15- भाषांतरविद्या	Elective	B.A. (MARATHI)
4	MAR.VI.E-13- माहितीपट (डॉक्युमेंटरी) : लेखन आणि उपयोजन	Elective	B.A. (MARATHI)
INTERDISCIPLINARY PAPER			
1	MAR.VI.ID-3- मराठी एकांकिका : स्वरूप व सादरीकरण	Interdisciplinary	B.A. (MARATHI)

उपस्थित सदस्यांद्वारा ज्या महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या आणि जे नवीन संदर्भ सुचवण्यात आले ते या चर्चेअंती मान्य करण्यात आले. सदस्यांद्वारा सुचवण्यात आलेले बदल खालीलप्रमाणे.

Semester I

१.१.१. सर्वप्रथम सत्र एक मधील **मराठी कथा स्वरूप आणि उपयोजन(१९४५-२०००**) हा पेपर चर्चेसाठी घेण्यात आला. **श्रेयांकन ३. उपयोजित स्तर(१९४५ ते १९६० पर्यंत) आणि ४. उपयोजित स्तर (१९६० नंतर)** यासाठी लावलेल्या एकूण १० कथांचे संपादित स्वरूपातील पुस्तक(ई-पुस्तक) तयार करण्यासाठी मागच्या अभ्यासमंडळातील त्रिसदस्यीय समितीसाठी सर्व सदस्यांनी सहमती दर्शवली.

१.१.२. उपयोजित स्तरावर १० पेक्षा जास्त कथा अतिरिक्त वाचनाच्या हेतूने जोडण्याची सूचना प्रा. विनायक बापट यानी केली. प्रा सोनिया सावंत यानी किमान १५ कथांची मर्यादा उपयोजित स्तरासाठी ठेवण्याचा प्रस्ताव मांडला.

१.२.१. सत्र एक मधील आधुनिक मराठी कविता स्वरुप व उपयोजन(आरंभ ते २०००) या पेपरच्या अभ्यासक्रमावरील चर्चेत **श्रेयांकन ३. उपयोजित स्तर- अ. स्वातंत्र्यपूर्व कविता श्रेयांकन ४. उपयोजित स्तर – ब. स्वातंत्र्योत्तर कविता.** यासाठी लावलेल्या एकूण १० उपयोजित कवितांचे संपादित स्वरूपातील पुस्तक (ई-पुस्तक) तयार करण्यासाठी मागच्या अभ्यासमंडळातील त्रिसदस्यीय समितीसाठी सर्व सदस्यांनी सहमती दर्शवली.

१.२.२. प्रा. रणधीर शिंदे यांनी संपादित पुस्तक काढण्यासाठी महाविद्यालयातील पुस्तक प्रकाशनविषयक योजनांचा आधार घेऊन तद्वत प्रस्ताव तयार करण्याची सूचना केली त्याचप्रमाणे खर्चाची अडचण असल्यास डिजिटल माध्यमातून पुस्तक निर्मितीचा मार्ग सुचविला.

१.२.३.उपयोजित स्तरावर १० पेक्षा जास्त कथा अतिरिक्त वाचनाच्या हेतूने जोडण्याची सूचना प्रा. विनायक बापट यानी केली. प्रा सोनिया सावंत यानी किमान १५ कथांची मर्यादा उपयोजित स्तरासाठी ठेवण्याचा प्रस्ताव मांडला.

Semester II

१.१.१. त्यापुढे दुसऱ्या सत्रातील मराठी कादंबरी स्वरूप व उपयोजन (१९४५-२०००)हा पेपर चर्चेसाठी घेण्यात आला. प्रा. अंजली नाईक यानी उपयोजित स्तरासाठी कादंबरी दर तीन वर्षानी बदलावी लागत असल्याने मंडळातील सदस्यांना एखादी गोमंतकीय कादंबरी उपयोजित स्तरासाठी सुचविण्याचा प्रस्ताव मांडला.

१.१.२. प्रा. स्नेहा म्हांबरे यांनी गोमंतकीय कादंबरीऐवजी मुख्य प्रवाहातील गाजलेली आणि समीक्षणात्मक लिखाण झालेली कादंबरी नेमण्याची सूचना केली जेणेकरून विद्यार्थी आणि शिक्षक दोघांसाठी ती अभ्यासणे सुलभ होईल.

१.१.३. प्रा. विनायक बापट यानी पुरवणी वाचनासाठी गोमंतकीय कादंबऱ्या ठेवण्याची सूचना केली (चंद्रकांत गावस – इदवास) आणि उपयोजित स्तरासाठी नव्वदनंतरच्या काळातील एखादी ग्रामीण कादंबरी घेणं उपयुक्त होईल असं मत मांडले.

Semester III

१.१.१. मराठी ललित गद्य स्वरूप व उपयोजन- प्रा. तृप्ती फळदेसाई यांनी उपयोजित स्तरावरील ललित लेख संग्रहाच्या प्रती उपलब्ध नसल्यामुळे दुसरं एखादं पुस्तक सुचविण्याची मागणी केली.

१.१.२. प्रा. बापट सरांनी गोमंतकीय ललित गद्य पुरवणी वाचनासाठी ठेऊन उपयोजित स्तरासाठी एखादी मुख्य धारेतील प्रसिध्द ललित लेख कलाकृती नेमण्याचा प्रस्ताव मांडला.

१.१.३. प्रा. शिंदे यांनी- अनिल अवचट, श्रीनिवास कुलकर्णी, मारूती चितमपल्ली, व्यंकटेश माडगूळकर यांच्या ललित लेखसंग्रहाची नावे सुचविली.

१.१.४. प्रा.बापट यांनी अंजली आमोणकर यांचे ललित लेखनाचा समावेश सुचविला त्याचबरोबर ललित लेखनाची वैशिष्ट्ये ज्या कलाकृतीत आढळतात ती पुस्तके उपयोजित स्तरावर घ्यावी ही बाब जोडली. कथा आणि कवितांप्रमाणेच ललित

संग्रहाचेसुध्दा संपादित पुस्तक (ई-पुस्तक) प्रकाशित करून, ललित लेखनाची वाटचाल त्यास जोडण्याची सूचना केली गेली.

१.१.५. प्रा. सोनिया सावंत यांनी बा.भ.बोरकर यांच्या ललित लेखनाचा आढावा घेण्याचे मत मांडले.

१.१.६. प्रा. स्नेहा म्हांबरे यांनी मीना समुद्र, शांता लागू. रा.भि. जोशी, अनंत काणेकर यांच्या ललित लेखांचा विचार करण्याचे परामर्श घेण्याचे सुचविले.

१.१.७. त्याचबरोबर प्रा विनायक बापट यांनी विशिष्ट एखादा सग्रंह उपयोजित स्तरासाठी न घेता त्याऐवजी प्रवाहातील १५ मुख्य लेखकांचे लेख उपयोजित स्तरासाठी लावण्यात यावे. तसेच त्यांचा संग्रहसुध्दा तयार करण्यात यावा अशी सूचना केली आणि ती सर्वमताने मान्य करण्यात आली.

१.१.८. ललित लेखांच्या संपादित पुस्तकासाठीची समिती- तृप्ती फळदेसाई, स्नेहा म्हांबरे- संपादक, निखिता गावकर याप्रकारे सदस्यानी बैठकीत मान्य केली.

१.२.१. यापुढे तिसऱ्या सत्रातील साहित्याभिरूची या पेपरसंबंधी चर्चा करण्यात आली. प्रा. अंजली नाईक यांनी दुसऱ्या श्रेयांकनातील ग्रंथ प्रकाशन या विषयासंबंधीचे संदर्भग्रंथ अभ्यासमंडळातील सदस्यांना माहित असल्यास मार्गदर्शन करण्याचा प्रस्ताव मांडला.

१.२.२. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रकाशनव्यवहारासंबंधीचे संदर्भ विविध गौरवग्रंथ(श्री.पु.भागवत, पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ, अशोक कोठारे- मॅजेस्टिक प्रकाशन), याशिवाय विविध प्रकाशक, मुद्रक इत्यादी या क्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्रे किंवा आत्मपर लेखन संदर्भासाठी घेण्याची सूचना केली.

१.२.३. प्रा. बापट यानी रसिकमित्र या साप्ताहिकातील प्रकाशनाविषयी उपयुक्त माहिती असलेल्या लेखांचा संदर्भ घेण्यास सुचविले. ललित मासिकामध्ये प्रकाशनाविषयीचा २०१३-१४ सालीचा विशेषांक संदर्भासाठी सुचविला गेला.

१.२.४. प्रा. स्नेहा म्हांबरे यानी महादेवशास्त्री जोशी यांच्या आत्मपुराण मध्ये१९६०ला स्थापन केलेली प्रकाशन संस्था, दादासाहेब सातोस्कर यांचे शुभदा प्रकाशन यात

प्रकाशनाविषयीचा आलेला वृत्तांत अभ्यासण्याची सूचना केली. ललित मासिकाचे संदर्भ दिले गेले.

१.२.५.प्रा. स्नेहा म्हांबरे यानी अभिवाचनाचा विषय जोडण्याची त्याचप्रमाणे आवाजाच्या चढ-उतारासंबंधी एखादं गेस्ट लेक्चर घेण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे त्यांनी चौथे श्रेयांकन दुसऱ्या क्रमांकावर घेण्याचा प्रस्ताव मांडला जेणेकरुन अभ्यासक्रमाला नेमकी दिशा मिळू शकते.

१.२.६. सर्व सदस्यांच्या संमंतीने **चौथे श्रेयांकन- गटवार पध्दतीने विविध उपक्रमांचे आयोजन**

अ. काव्यवाचन , कथाकथन

ब.पारितोषिक वितरण आणि विविध पुरस्कारांची माहिती हे दुसऱ्या क्रमांकाच्या श्रेयांकनाच्या जागी नेमण्यात आले.

१.२.७. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून हा पेपर जास्त प्रभावीपणे शिकविता येतो हे मत सर्व सदस्यानी मांडले. पु.ल.देशपांडे, रत्नाकर मत्करी यांचे विडिओ मिळवण्याची सूचना प्रा स्नेहा म्हांबरे यांनी केली.

१.३.१.गोमंतकीय मराठी साहित्य संशोधन हा पेपर द्वितीय वर्षासाठीच ठेवण्याची सूचना प्रा स्नेहा म्हांबरे यांनी केली. सर्व सदस्यांनी याबाबत सहमती दर्शवली.

१.४.१.प्रा. तृप्ती फळदेसाई यांनी महाविद्यालयाच्या नवीन धोरणानुसार स्वयम चे ऑनलाईन कोर्सेस अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासंदर्भात प्रस्ताव मांडला.

१.४.२. मराठीमध्ये स्वयमचा एकही कोर्स उपलब्ध नसल्याने इंग्रजी माध्यमातून साहित्याशी निगडित काही निवडक विषयांची माहिती सादर केली गेली.

१.४.३. त्यापैकी Introduction to Modern Indian Drama (आधुनिक भारतीय नाट्याचा परिचय) हा कोर्स सर्व सदस्यांच्या सहमतीने अभ्यासक्रमात जोडण्याचा प्रस्ताव पारित करण्यात आला.

१.४.४. प्रा. तृप्ती फळदेसाई यांनी विभागाद्वारे तयार करण्यात आलेला LOCF सदस्यांपुढे सादर केला.

Part B.

१. MAR-I.C-1, श्रेयांकन ३. उपयोजित स्तर(१९४५ ते १९६० पर्यंत) आणि ४. उपयोजित स्तर (१९६० नंतर) यासाठी लावलेल्या एकूण १० कथांचे संपादित स्वरूपातील पुस्तक(ई-पुस्तक) तयार करण्यासाठी मागच्या अभ्यासमंडळातील त्रिसदस्यीय समितीसाठी सर्व सदस्यांनी सहमती दर्शवली. उपयोजित स्तरावर १० पेक्षा जास्त कथा अतिरिक्त वाचनाच्या हेतूने जोडण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. त्यासाठी शंकर पाटील- वळीव, द. मा. मिरासदार- भुताचा जन्म, शंकरराव खरात- सांगावा, बाबुराव बागुल- जेव्हा मी जात चोरली होती, चारूता सागर- भूक, नरेश कवडी- चुळचुळ मुंगी पळी-पळी कंटाळा, भाऊ पाध्ये- एक सुन्हेरा ख्वाब, नारायण महाले- आमोरी, नीरजा- ओल हरवलेली माती, सानिया- स्वाध्याय या कथांची निवड करण्यात आली.

२. MAR-I.C-2, श्रेयांकन ३. उपयोजित स्तर- अ. स्वातंत्र्यपूर्व कविता श्रेयांकन ४. उपयोजित स्तर - ब. स्वातंत्र्योत्तर कविता. यासाठी लावलेल्या एकूण १० उपयोजित कवितांचे संपादित स्वरूपातील पुस्तक (ई-पुस्तक) तयार करण्यासाठी मागच्या अभ्यासमंडळातील त्रिसदस्यीय समितीसाठी सर्व सदस्यांनी सहमती दर्शवली. उपयोजित स्तरावर १० पेक्षा जास्त कविता अतिरिक्त वाचनाच्या हेतूने जोडण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. त्यासाठी भा. रा. तांबे- (जन पळभर म्हणतील हाय हाय, मरणात खरोखर जग जगते), अनिल- (मानवता, तळ्याकाठी), बा. सी मर्ढेकर- (गणपतवाणी, नव्या मनूतिल गिरिधर पुतळा), दि. पु. चित्रे- (स्मरणपत्र, देवा, ह्याही देशात पाऊस पाड), यशवंत मनोहर- (कालचा पाऊस, खूपदा), दया पवार- (कोंडवाडा, बाई मी धरण बांधते), इंद्रजित भालेराव- (शिक बाबा शिक, आता लढायला शिक, माझ्या गावाकडं चल माझ्या दोस्ता), नीरजा- (निरन्वय, गर्दी चेहरा नसलेली) या कवितांची निवड करण्यात आली.

३. MAR-III.E-3, श्रेयांकन १- वाचनसंस्कृती आणि वाचनाचे विविध स्तर. यामध्ये अभिवाचनाचा मुद्दा सर्वसंमतीने जोडण्यात आला. सर्व सदस्यांच्या

संमंतीने चौथे श्रेयांकन- गटवार पध्दतीने विविध उपक्रमांचे आयोजन. अ. काव्यवाचन , कथाकथन ब.पारितोषिक वितरण आणि विविध पुरस्कारांची माहिती हे दुसऱ्या क्रमांकाच्या श्रेयांकनाच्या जागी नेमण्यात आले.

४. महाविद्यालयाच्या नवीन धोरणानुसार स्वयम चे ऑनलाईन कोर्सेस अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी Introduction to Modern Indian Drama (आधुनिक भारतीय नाट्याचा परिचय) तसेच Effective Writing हे कोर्स सर्व सदस्यांच्या सहमतीने अभ्यासक्रमात जोडण्याचा प्रस्ताव पारित करण्यात आला.

The forgoing minutes of meeting were read by the Member Secretary at the meeting itself and they were unanimously approved by all the members present.

1. Miss Trupti Fal Dessai – Chairman
2. Dr. Randheer Shinde – Academic Council Nominee
3. Dr. Sneha Mahambre- Academic Council Nominee
4. Prof. Vinay Bapat – Vice-Chancellor Nominee
5. Mr. Suresh Bhandari – Industry/Corporate Sector
6. Miss. Sonia Sawant - Alumni
7. Miss Anjali Naik- Member Secretary
8. Miss Nikhita Goankar – Member
9. Mr. Pramod Pawar- Member

Date :- 13th November 2020

Signature of the Chairperson

(Miss Trupti Fal Dessai)

Part C :- The remarks of the Dean of the faculty :-

a. The minutes are in order
b. The minutes may be placed before the Academic Council with remark, if any.
c. Important points of the minutes which need clear policy descion of the Academic council to be recorded.

Date :- 13th November 2020

Signature of the Dean ----------

MEMBER-SECRETARY
Academic Council
PARVATIBAI CHOWGULE COLLEGE
OF ARTS & SCIENCE (AUTONOMOUS)
MARGAO-GOA